# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकार व महाराष्ट्र शासन याचा संयुक्त प्रकल्प)

संक्रमण कार्यालय 'इ'- ब्लॉक,सिटी पार्कची उत्तर बाजू
आयकर कार्यालय 'ए' विंगच्या मागे, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई 400051

## मेट्रो 3 मार्गिकेच्या नजिकच्या क्षेत्रात
# वृक्षारोपणाचे आवाहन

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (मुं.मे.रे.कॉ.लि) या भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त उपक्रमातर्फे बृहन्मुंबई महानगर पालिका(बृ.म.पा.) क्षेत्रातील मेट्रो लाइन 3 प्रकल्पाच्या संरेखना आसपास/मार्गिकेच्या नजिकच्या क्षेत्रात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. नागरिकांच्या सहभागातून स्थानक  क्षेत्राच्या बाहेर आणि आसपासच्या भागात वृक्षारोपण केले जावे, असा मुं.मे.रे.कॉ.लि चा उद्देश आहे. मुं.मे.रे.कॉ.लि तर्फे माननीय उच्च न्यायालयापुढे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे पालन करण्यासाठी हे वृक्षारोपण करण्यात येत आहे. वृक्षांचा पुरवठा, लागवड आणि पुढील सलग तीन वर्षे त्यांची देखभाल ही मुं.मे.रे.कॉ च्या ठेकेदाराची जबाबदारी असेल.

या सूचनेद्वारे मुं.मे.रे.कॉ.लि विविध सरकारी/खाजगी कार्यालये, निवासी संकुले, शैक्षणिक संस्था, रुग्णालये इत्यादी आस्थापनांना (पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र असलेले) या वृक्षारोपण उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहे. इच्छुक अर्जदार/एजन्सीजने नोडल ऑफिसरशी खालील माध्यमांतून संपर्क साधावा. वृक्षारोपणासाठीच्या अर्जाचा नमुना या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल

⇨ https://mmrcl.com/en/documents/5635/Public%20Notice%20

या संदर्भातील अर्ज 15 जुलै 2024 रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार आणि एमएमएल-3 कॉरिडॉरच्या दोन्ही बाजूस 500 मी. क्षेत्रातील आवारांना प्राधान्य दिले जाईल.

नोडल अधिकारी: श्री. योगेश कदम (हॉर्टिकल्चरिस्ट, मुं.मे.रे.कॉ.लि)
ईमेल: yogesh.kadam@mmrcl.com  मो. +91 9420807299

सही/-
संचालक
(नियोजन, रिअल इस्टेट डेव्ह./एनएफबीआर)